# ‘रविकिरण’च्या बालनाट्य स्पर्धेत ‘नभी उतरे इंद्रधनू’ सर्वोत्कृष्ट!



**मुंबई :** कामगार विभागात गेली ५८ वर्षे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या रविकिरण संस्थेतर्फे नुकतीच ३२वी सुलभाताई देशपांडे यांच्या स्मरणार्थ बालनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत डोंबिवली येथील रवींद्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या ‘नभी उमटे इंद्र धनु’ या नाट्यास प्रथम, महाराष्ट्र राज्य जवाहर बाल भवन यांच्या ‘कस्तुरी’स द्वितीय तर कल्याणच्या सेक्रेट हार्ट स्कूलच्या ‘अ ते ज्ञ’ या बालनाट्यास तृतीय पारितोषिक मिळाले.

उत्तेजनार्थ म्हणून डोंबिवलीच्या सुयश नाट्य संस्थेच्या ‘गोष्ट जंगलाची’, पुणे येथील आकांक्षा बाल रंगभूमीच्या ‘बफरिंग’ या बालनाट्यास गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून संवाद लेखक, सिनेनाट्य कलाकार प्रल्हाद कुडतरकर व विशेष अतिथी म्हणून सुलभाताईचे ज्येष्ठ सुपुत्र निनाद देशपांडे उपस्थित होते. या वेळी डोंबिवली येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या माजी शिक्षिका भाग्यलक्ष्मी पडसलगीकर यांचा निनाद देशपांडे व प्रल्हाद कुडतरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# रविकिरणच्या बालनाट्य स्पर्धेत
# 'नभी उमटे इंद्रधनू' सर्वोत्कृष्ट

## लहानग्यांच्या अभिनयाचा लागला कस



मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) – रविकिरण संस्थेच्या बालनाट्य स्पर्धेत लहानग्यांच्या अभिनयाचा चांगलाच कस लागला. दामोदर हॉल येथे दोन दिवस चाललेल्या या बालनाट्य स्पर्धेत 'नभी उमटे इंद्रधनू' या डोंबिवलीच्या रवींद्र शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या बालनाट्याने बाजी मारली. या नाटकाने पाच हजार रुपये रोख, आकर्षक चषक, प्रशस्तिपत्रक आणि फिरता सुवर्ण चषक पटकावला.

संस्थेने बालनाट्य स्पर्धेच यंदा ३२ वे वर्ष साजरे केले. यंदा ही स्पर्धा अभिनेत्री सुलभा देशपांडे यांच्या स्मरणार्थ आयोजित केली होती. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला संवाद लेखक, सिनेनाट्य कलाकार 'रात्रीस खेळ चाले फेम' प्रल्हाद कुडतरकर आणि विशेष उपस्थिती म्हणून दिवंगत अभिनेत्री सुलभा देशपांडे यांचे पुत्र निनाद देशपांडे उपस्थित होते. स्पर्धेच्या निमित्ताने 'स्मृतिर्पण' ही स्मरणिका पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित केली. या स्मरणिकेचे मुखपृष्ठ कला दिग्दर्शक समीर अन्नारकर यांनी केले होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून लीला हडप, शिरीष राणे, श्रीनिवास नार्वेकर यांनी काम पाहिले अशी महिती मंडळाचे चिटणीस नागेश वांद्रे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनच्या कस्तुरी या बालनाट्याला द्वितीय तर कल्याणच्या सेक्रेट हार्ट स्कूलच्या 'अतेज्ञ' या बालनाट्याला तृतीय आणि डोंबिवलीच्या 'गोष्ट जंगलाची' या तसेच पुण्याच्या आकांक्षा बालरंगभूमीच्या 'बफरिंग' या बालनाट्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली.